## विशेष दिवाणी दावा क्र.१०/२०१४ मध्ये निशाणी क्र.११० कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे दाखल केला आहे. वादींनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादींनी नि. १०७ कडे 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांनी सदर 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' मधील अनु. क्र. ८ चा दस्त मान्य केला आहे. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' मधील अनु. क्र. ८ च्या दस्तास निशाणी क्रमांक देण्यात यावा.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१८ ते २० व २३ यांचे म्हणणे घेण्यात आले आहे. प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्यातर्फे प्रस्तुत अर्जास नि.क्र.१११ कडे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादींना निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' मधील अनु. क्र. ८ कडील दस्त मान्य नाही.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादी व प्रतिवादी क्र.१८ ते २० व २३ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी निशाणी क्र.१०७ कडे दि.प्र.संहिता क्रम १२, नियम ३ मधील तरतुदीप्रमाणेची 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' दाखल केली आहे. सदर नोटीसमध्ये एकुन नऊ कागदपत्रांचा उल्लेख केला आहे. वादींनी दाखल केलेल्या सदर 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' ची प्रतिवादींनी नोंद घ्यावी व त्यांचा जबाब द्यावा असा आदेश न्यायालयाने निशाणी क्र.१०७ वर पारीत केला आहे. प्रतिवादी क्र. १८

ते २० व २३ यांच्या विद्वान वकीलांनी सदर निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसवर दिनांक १०/११/२०२१ रोजी असा जबाब दाखल केला आहे की, 'This notice to admit of documents are not admitted except document No.8'. निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसवर प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्यातर्फे दिलेल्या जबाबावरुन असे दिसून येते की, सदर प्रतिवादींना निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी अनुक्रमांक ८ कडील दस्त सोडुन इतर कागदपत्र मान्य नाहीत. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्यातर्फे निशाणी क्र. १०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसवर दिनांक १०/११/२०२१ रोजी दिलेल्या जबाबानुसार सदर प्रतिवादींनी सदरच्या निशाणी क्र.१०७ कडील नोटीसमधील अनुक्रमांक ८ कडील दस्त मान्य केला आहे. वादींनी प्रस्तुतचा निशाणी क्र. ११० कडील अर्ज दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.१८ ते २० व २३ यांच्यातर्फे निशाणी क्र. १०७ कडील नोटीसवर दिनांक २५/११/२०२१ रोजी पुन्हा असा जबाब दिला आहे की, प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांनी दस्त क्र.८ हा नजरचुकीने मान्य केला आहे व सदर प्रतिवादी हे सदरचा दस्त क्र.८ मान्य करु इच्छीत नाहीत. परंतु प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्यातर्फे निशाणी क्र. १०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसवर दिनांक १०/११/२०२१ रोजी दिलेल्या जबाबानुसार सदर प्रतिवादींनी सदरच्या निशाणी क्र.१०७ कडील नोटीसमधील अनुक्रमांक ८ कडील दस्त मान्य केला असल्याने माझ्या मते वादींनी सदरच्या निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसमधील अनुक्रमांक ८ कडील दस्तास निशाणी क्रमांक देण्याची केलेली विनंती समर्थनीय आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय आहे व तो मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी क्र.१०७ कडील 'नोटीस टू ॲडमीट डॉक्युमेंट' या नोटीसमधील अनुक्रमांक ८ कडे नमूद केलेल्या दस्तास निशाणी क्रमांक देण्यात यावा.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.02.17 15:46:00 +0530

(पां.लिं. घुले)

दिनांकः– १७/०२/२०२२

दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,
दारव्हा.